“सर्वांसाठी घरे -२०२२” या धोरणाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या क्षेत्रात असलेल्या सर्व शासकीय विभागांच्या (वन विभाग वगळून) जमिनींवरील अतिक्रमणे नियमानुकूल करण्याबाबत....

# महाराष्ट्र शासन

## नगर विकास विभाग

**शासन निर्णय क्रमांक :- संकीर्ण-२०१९/प्र.क्र.१५ /नवि-२६**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- ०६ मार्च, २०१९

**संदर्भ :-**

१) शासन निर्णय, गृहनिर्माण विभाग, क्रमांक-प्रआयो-२०१५/प्र.क्र.११०/गृनिधो-२ (सेल) दिनांक ९ डिसेंबर, २०१५

२) शासन निर्णय, नगरविकास विभाग, क्रमांक-एमयुएन-२०१८/प्र.क्र.१९७/नवि-१८ दिनांक १७ नोव्हेंबर,२०१८ व दिनांक २६/०२/२०१९ चे शुध्दीपत्र

**प्रस्तावना :-**

केंद्र व राज्य सरकारने सन २०२२ पर्यंत सर्व बेघर कुटुंबांना घर देण्याची महत्वाकांक्षी मोहिम हाती घेतली आहे. याकरीता केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना राज्यातील ३८२ शहरे व त्यालगतच्या नियोजन क्षेत्रामध्ये राबविण्यास केंद्र शासनाने मान्यता दिली आहे. प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत शहरी भागात लाभार्थ्यांची निवड स्वत:च्या मालकी हक्काची जागा व वार्षिक उत्पन्न या निकषाच्या आधारे केली जाते व मान्य केलेल्या कृती आराखड्याची अंमलबजावणी कार्यान्वयीन यंत्रणेमार्फत केली जाते. यासाठी, गृहनिर्माण विभागाने उपरोक्त संदर्भाधीन क्र.०१ अन्वये धोरण निश्चीत केलेले आहे. या धोरणानुसार, झोपडपट्टयांचा आहे तेथेच विकास करणे अपेक्षीत आहे. तथापि, या धोरणानुसार ज्या पात्र लाभार्थ्यास स्वत:ची जागा नाही अथवा असा पात्र लाभार्थी या योजनेचा लाभ घेऊ शकत नाही. परिणामी या महत्वकांक्षी योजनेपासून असा व्यक्ती वंचित राहू शकतो.

यासाठी मा.मंत्रीमंडळाच्या दिनांक १३/११/२०१८ रोजी झालेल्या बैठकीत झालेल्या निर्णयानुसार, महसूल विभागाच्या अखत्यारित असलेल्या कोणत्याही प्रकारच्या शासकीय जमिनीवरील अतिक्रमणदारासंदर्भात उपरोक्त संदर्भाधीन क्र.०२ येथील शासन निर्णयान्वये मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. त्याअनुषंगाने प्रधानमंत्री आवास योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी मोठ्या प्रमाणात मदत होत असल्याचे दिसून आले आहे.

याच धर्तीवर, उपरोक्त संदर्भाधीन क्र.०२ येथील शासन निर्णयातील मार्गदर्शक सूचना राज्य शासनाच्या उर्वरित सर्व विभागांच्या (वन विभाग वगळून) नागरी भागात असलेल्या जमीनीवरील अतिक्रमणधारकांनाही या योजनेचा लाभ मिळण्याच्या दृष्टीने लागू करावयात याबाबतचा प्रस्ताव